मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये प्राप्त अपील.

अपिल क्रमांक :- २४१०/२०१३/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर,
पुणे-४११००१

१) श्रीमती धनश्री अजय पोळ : अपिलार्थी
द्वारा श्री.शशिकांत बाबासाहेब खंदारे
शंकरनगर (स्वरुपनगर), ता.माळशिरस,
जि.सोलापूर-४१३ ११८

विरुध्द

२) जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, गोकुळ शिरगांव,
पुणे-बेंगलोर रोड, कोल्हापूर-४१६ २३४

३) प्रथम अपिलीय अधिकारी,
के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, गोकुळ शिरगांव,
पुणे-बेंगलोर रोड, कोल्हापूर-४१६ २३४

(आदेश पारित दिनांक - १९/०३/२०१५)

अपिलार्थी यांनी दि.२३/०७/२०१३ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी दि.१८/०३/२०१५ रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीचा मूळ माहिती अर्ज दि.०७/०३/२०१३ रोजीचा असून दि.०३/०४/२०१३ च्या पत्राने उत्तर दिले की, के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोकुळ शिरगांव हे कायम स्वरुपी विनाअनुदानीत आहे. आम्ही 'सार्वजनिक प्राधिकरण' नाही त्यामुळे तुम्ही आम्हाला माहिती अधिकार कायद्याखाली माहिती मागू शकत नाही. तथापि दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती आम्ही दिवाणी

K/15
REGD 63/15/4/15

न्यायालयात सादर केली आहे. त्यावर अपिलार्थीनी दि.२४/०४/२०१३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलात सुनावणी घेऊन दि.०५/०५/२०१३ रोजी अपील निकाली काढण्यात आले.

सुनावणीच्या वेळीचा युक्तीवाद व प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेता तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ नगर युवक शिक्षण संस्था व यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ या प्रकरणी दि.२०/०८/२००९ रोजी खाजगी संस्थेची विनाअनुदानित महाविद्यालये माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे "सार्वजनिक प्राधिकरण"च्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत असा निर्णय दिलेला आहे.

सबब प्रस्तूत प्रकरणांत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील क्र.२४१०/२०१३/सोलापूर निकाली काढण्यात येत आहे.

STATE INFORMATION COMMISSION, MAHARASHTRA * PUNE BENCH *

(रवींद्र जाधव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

K/15